# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/03/2023 (मंगळवार) सकाळ

---

## जबरी संभोग

पो.स्टे. काटोल :– दिनांक ८/०१/२०२१ ते दिनांक २९/१२/२०२२ चे ००/०० वा. ते ००/०० वा. पावेतो चे सुमारास यातील नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी पिडीत मुलगी वय १९ वर्षे ही सन २०२१ मध्ये महावीर कपडयाचे दुकानात काम मिळाल्याने काटोल येथे रेवतकर लेआउट काटोल येथे किरायाने रूम करून राहत होती व महावीर कपडयाचे दुकान तारबाजार काटोल येथे काम करीत होती. त्यादरम्यान फिर्यादीची फेसबुकवर आरोपी नामे– अमर बिघाने, वय २५ वर्षे, रा. आग्रा ता. नरखेड यांचेशी ओळख झाल्याने दोघांमध्ये प्रेमसबंध निर्माण झाले. या दररम्यान आरोपीने फिर्यादीला रिधोरा डॅम येथे नेवुन लग्नाचे आमीष दाखवुन शारीरीक संबंध केले तसेच दि. २९/१२/२०२२ रोजी दुपारी ११.०० वा. दरम्यान आरोपीने फिर्यादीला फोन करून व आग्रा येथे सागरा हनुमान मंदिर येथे भेटायला बोलावुन दि.२९/१२/२०२२ रोजी १२/०० वा. दरम्यान सागरा हनुमान मंदिर परीसरातील पडीत असलेल्या जंगल झुडपामध्ये नेवुन फिर्यादीला लग्नाचे आश्वासन देवुन शारीरीक संबध केले. त्यानंतर फियादीने आरोपीला लग्नाबाबत विचारणा केली असता आरोपी लग्नाबाबत टाळाटाळ करू लागला. आरोपीने फिर्यादी सोबत दि. ०८/१/२०२१ ते दि. २९/१२/२०२२ या दरम्यान लग्नाचे खोटे आमीष दाखवुन वारंवार शारीरीक संबंध प्रस्थापीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६ (२), (जे), ३७६(२) (एन) भादवी, सहकलम ४, ६ बाल लैंगिक अत्याचार संरक्षण अधिनियम २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लोंदे पो.स्टे. काटोल मो. नं. ९८५०९०७६८ हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. बेला :– अंतर्गत ३४ कि.मी. अंतरावरील मौजा चिखलापार शिवार येथे ०५/०३/२०२३ चे २१.३० वा. ते २२.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे– श्रीमती चमरीबाई पांडुरंग चौव्हाण, वय ६० वर्ष रा. मांडवा ता. भिवापूर जि. नागपूर हिचा नातू नामे– दिपक चौव्हाण वय २२ वर्ष हा मौजा चिखलापार येथे नाटक पाहण्यासाठी गेला असता तेथे त्याला लोकांनी मारहाण केल्याबाबत माहीती त्याने फोनवर दिल्याने फिर्यादी ही नातेवाईकांसह व गावातील लोकांसह चिखलापार येथे गेली असता तेथील ५ ते ६ अनोळखी लोकांनी त्यांना हातबूक्यांनी मारहान केली व फिर्यादीचा मुलगा शेखलाल चौव्हाण यास लाठीने मारहान केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, १४३, १४७, १४९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि अजित कदम ठाणेदार पोस्टे बेला हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर